



# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ४१, मंगळवार ३० डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## नगर-पुणे इंटरसिटी रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणास मान्यता

### ■ खासदार नीलेश लंके यांची माहीती ■ हिवाळी अधिवेशनात वेधले होते सरकारचे लक्ष



**नगर : प्रतिनिधी**

**नगर-पुणे या१२५किलोमिटर अंतराच्या रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिल्याची माहीती खासदार नीलेश लंके यांनी दिली. नगर-पुणे इंटरसिटी ट्रेन सुरू करण्यासंदर्भात खा. लंके यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधले होते. त्याची दखल घेत या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण करण्यास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे.**

संसदेमध्ये नगर-पुणे रेल्वे मार्गाची मागणी करताना खा. लंके यांनी नगर शहर व आजूबाजूच्या गावांतील तरूण, सरकारी कर्मचारी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी,महिला यांसह मोठया संख्येने लोक काम, व्यवसाय, शासकीय सेवा आणि शिक्षणासाठी नगर ते पुणे दरम्यान नियमितपणे ये-जा करतात. या प्रवाशांना रस्त्याने प्रवास करताना विशेषतः प्रचंड वाहतूक कोंडी आणि बसेसमध्ये जास्त गर्दी यामुळे मोठया समस्यांचा सामना करावा लागतो. या समस्या सोडविण्यासाठी नगर ते पुणे दरम्यान इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करणे आवष्यक असल्याचे खा. लंके यांनी संसदेत बोलताना स्पष्ट केले होते.

नगर-पुणे इंटरसिटी सेवा सुरू झाल्यास निः संशयपणे दोन्ही शहरांमध्ये दररोज प्रवास करणाऱ्या विविध श्रेणीतील प्रवशांना फायदा होईल. याशिवाय माल वाहतूक, बोगी वाहतुकीच्या उद्देशाने रेल्वेला जोडल्यास त्यातून रेल्वेस उत्पन्न मिळले. कारण नगर आणि परिसरातील अनेक व्यापारी पुण्यातून माल खरेदी करतात आणि त्यांच्या मालाची वाहतूक करण्यासाठी या सेवेचा वापर करू शकतात. त्यामुळे नगर-पुणे इंटरसिटी ट्रेन ट्रायल आणि रन तत्वावर सुरू करण्यात यावी अशी मागणी खा. लंके यांनी संसदेमध्ये केली होती.

## मेलबर्न कसोटीत ऑस्ट्रेलियाने मारली बाजी !

### शेवटच्या तासाभरात भारताने गमावल्या ७ विकेट्स



**मेलनबर्ग : वृत्तसंस्था**

**भारताला नमवत अखेरीस ऑस्ट्रेलियाने मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर विजय नोंदवला आहे. ऑस्ट्रेलियाने मेलबर्न कसोटीत भारताचा १८४ धावांनी पराभव करत मोठा विजय नोंदवला आहे. या विजयासह ऑस्ट्रेलियाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये २-१ ने आघाडी मिळवली आहे. भारतीय संघाच्या कमजोर फलंदाजीने या सामन्यात संघाला पराभव मिळवून दिला आहे. एका क्षणाला भारतीय संघ हा कसोटी सामनाही ड्रॉ करेल अशी आशा होती, पण भारताच्या फलंदाजांनी या निर्णयावर पाणी फेरलं आहे.**

मेलबर्न कसोटीत ऑस्ट्रेलियाने भारतासमोर विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य ठेवले होते, ज्याचा पाठलाग करताना टीम इंडियाचा दुसरा डाव केवळ १५५ धावांवरच आटोपला. भारताच्या ७ फलंदाजांनी तासाभरात एकापाठोपाठ आपल्या विकेट्स गमावल्या. एकूण ३०० पेक्षा जास्त धावांचा पाठलाग करताना टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागण्याची ही कसोटी क्रिकेटमधील ४९वी वेळ आहे.

चौथ्या दिवशी ९ गडी गमावून ३३३ धावांची आघाडी घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाने ५व्या दिवशी आपल्या धावसंख्येत आणखी ६ धावांची भर घातली आणि भारताला ३४०धावांचे लक्ष्य दिले. मेलबर्नच्या मैदानावर हे विजयी लक्ष्य गाठणं टीम इंडियासाठी मोठे आव्हान होते, कारण आतापर्यंत या मैदानावर सर्वात यशस्वी धावांचा पाठलाग ३३२ धावांचा होता. पण भारताच्या युवा फलंदाजांनी चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करत कसोटी ड्रॉ करण्याचा प्रयत्न केला पण ऑस्ट्रेलियाच्या भेदक गोलंदाजीपुढे फलंदाजांनी शरणागती पत्करली.

भारताने पहिल्या सत्राच्या अखेरपर्यंत ३३ धावांवर ३ मोठे विकेट गमावले. यानंतरऋषभ पंतआणि यशस्वी जैस्वाल यांनी दुसरे सत्र एकही विकेट न गमावता ३ बाद ११२ धावा केल्या. इथून भारतीय संघ हा सामना अनिर्णित ठेवेल अशी आशा होती. पण तिसऱ्या सत्रात भारताने पहिल्या तासाभरातच झटपट ७ विकेट्स गमावल्या. यामध्ये ऋषभ पंतने पुल शॉट खेळत आपली विकेट गमावली, त्याच्या या शॉटवरून त्याला प्रचंड ट्रोल केलं जात आहे. यानंतर यशस्वी जैस्वालही बाद नसतानाही त्याला बाद दिल्याची चर्चा चाहत्यांमध्ये रंगली आहे. जैस्वाल ८२ धावा करून खेळत होता आणि शॉर्ट चेंडूवर फटका खेळण्याच्या नादात तो बाद झाला, पण तिसऱ्या पंचांनी स्निकोमीटरवर हालचाल नसतानाही त्याला बाद घोषित केले होते. यानंतर आकाशदीपच्या झेलबाद बाबतही अशीच चर्चा आहे.

ऑस्ट्रेलियाने मेलबर्नमधील विजयासह या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. आता पुढचा आणि अखेरचा सामना ३ जानेवारीपासून सिडनीमध्ये खेळवला जाणार आहे. भारताला जर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या शर्यतीत टिकून राहायचे असेल तर सिडनी कसोटी भारताला कोणत्याही स्थितीत जिंकावी लागेल.

## फडणवीस इन ॲक्शन!

### ■ पोलीस दलात मोठी उलथापालथ होणार ■ अनेकांवर टांगती तलवार?



**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील प्रशासनात आणि पोलीस दलात येत्या काही महिन्यांत मोठे बदल होणार आहेत. अनेक अधिकाऱ्यांना पदावरुन हटवले जाण्याची शक्यता आहे. आठवड्यापूर्वीच बीडच्या पोलीस अधीक्षकांची उचलबांगडी करण्यात आली. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासात दिरंगाई केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रशासनावरील त्यांची पकड घट्ट करण्यासाठी बरेच फेरबदल करण्याच्या तयारीत आहेत. टाईम्स ऑफ इंडियाने सुत्रांच्या हवाल्याने याबद्दलचे वृत्त दिलेआहे.**

मुख्यमंत्री फडणवीस प्रशासनासह पोलीस दलात मोठे बदल करण्याच्या तयारीत आहेत. गेल्या १० वर्षांतील कामाचं मूल्यमापन करुन अधिकाऱ्यांना नवीन पोस्टिंग देण्यात येईल. २०१४ ते २०१९ या कालावधीत फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या पोस्टिंगमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. २०२२ मध्ये देवेंद्र फडणवीस पुन्हा सत्तेत आले. पण तेव्हा त्यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले. त्यावेळी गृहमंत्रिपद त्यांच्याकडेच होते. २०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असताना फडणवीसांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या दोन दशकांच्या कामगिरीच्या आधारे नव्या जबाबदाऱ्या दिल्या होत्या. स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांना फडणवीसांनी महत्त्वाच्या पदांवर पाठवले होते. आता पुन्हा एकदा फडणवीस तोच पॅटर्न राबवण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनात धास्ती आहे. काही अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देताना त्यांची

उर्वरीत पान ३ वर

## प्राजक्ताच्या तक्रारीची महिला आयोगाकडून दखल

### मुंबई पोलीस आयुक्तांना चौकशीचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

**भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत असताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचा नामोल्लेख केला होता. परळीत इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचा वेगळाच परळी पॅटर्न आहे. याठिकाणी मोठ मोठ्या सेलिब्रिटी येत असल्याचे सांगून धस यांनी काही महिला कलाकारांची नावे घेतली होती. यानंतर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात आता महिला आयोगाने मोठे पाऊल उचलले असून मुंबई पोलिसांना निर्देश दिले आहेत.**

अभिनेत्रीप्राजक्ता माळीयांची तक्रार आयोग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याचा अभ्यास करून, कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही नियमानुसार आयोग करेल, असे विधान राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी काल केले होते. याबाबत त्यांनी एक्सवर एक पोस्टही केली होती.

त्यानंतर आता राज्य महिला आयोगाच्या एक्स अकाऊंटवर कारवाईबाबत माहिती देण्यात आली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाला प्राजक्ता माळी यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. बीड जिल्ह्यातील आमदार सुरेश धस यांनी श्रीमती माळी यांच्याबद्दल केलेले कथित अयोग्य, अवमानकारक

उर्वरीत पान ३ वर

## महाराष्ट्राच्या मनात आहे, ते दोन्ही पवार करतील!

### शरद पवारांच्या भेटीनंतर दादांच्या आमदाराचे वक्तव्य



**पुणे :प्रतिनिधी**

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठे यश मिळाले आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ १० जागांवर समाधान मानावे लागले. विधानसभा निवडणुकीनंतर दोन राष्ट्रवादीत अधिक कटुता येईल अशी चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे दोन राष्ट्रवादींच्या मनोमिलनाची चर्चा जोर धरू लागली आहे. त्याचं कारण म्हणजे दोन्ही पक्षातले शीर्षस्थ नेतृत्व हे एकमेकांच्या संपर्कात असल्याच्या अनेक घटना गेल्या काही

उर्वरीत पान ३ वर









निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

काही पदार्थ आपल्या आहारात समाविष्ट केल्याने पोटाच्या या समस्या कमी करता येऊ शकतात. चला, अशा ७ पदार्थांबद्दल जाणून घेऊया, जे पोटाच्या गॅससाठी आणि गुडगुडी कमी करण्यासाठी उपयोगी ठरू शकतात.



## ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांचं का वाढतं वजन?

लठ्ठपणा ही एक समस्या आहे जी जगभरातील लोकांच्या चिंतेच कारण आहे. लठ्ठपणाकडे भविष्यातील महामारी म्हणूनही पाहिले जात असून लठ्ठपणा टाळण्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ देत आहेत. तज्ज्ञांच्या मते, लठ्ठपणा वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे चुकीची जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी. त्याच वेळी, कधीकधी काही आजारांमुळे लोक त्यांचे वजन नियंत्रित करू शकत नाहीत. गेल्या काही वर्षांत, लोकांचे जलद वजन वाढण्याशी संबंधित अनेक अहवाल आले आहेत आणि यामध्ये ऑफिसमध्ये जास्त वेळ काम करणाऱ्या लोकांचा समावेश आहे. ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये काही चुका सामान्य असतात आणि हेच कारण त्यांच्या वजन वाढण्याचे प्रमुख कारण बनू शकते. सहसा लोक या सवयींना किरकोळ समजतात आणि त्या पुन्हा पुन्हा करतात. कारण त्यांना असे वाटते की, त्यांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही. पण हाच निष्काळजीपणा आरोग्यासाठी खूप घातक ठरू शकते. अशाच काही चुका पाहूया ज्यामुळे लठ्ठपणा आणि संबंधित आरोग्य समस्यांचा धोका वाढू शकतो



### वेळेत न जेवण्याची सवय

अनेकदा कामात असल्यामुळे वेळेवर कोणताच आहार होत नाही. मग तो नाष्टा असो वा जेवणं. ऑफिसला जाणाऱ्यांमध्ये ही सवय खूप दिसून येते की ते जेवणाची कोणतीही ठराविक वेळ ठरवत नाहीत आणि कधी १२ वाजता तर कधी ४ वाजता जेवायला जातात. त्याच वेळी, काम जास्त असताना काही लोक दुपारचे जेवणही घेत नाहीत. हा निष्काळजीपणाचा त्यांच्या आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. उशिरा जेवण घेण्याच्या सवयीमुळे शरीरातील चयापचय गती बिघडते आणि त्यामुळे त्यांचे वजन वाढू लागते.

### न चावता जेवणे, पटापट जेवणे

लोक जास्त कामामुळे किंवा घाईमुळे अन्न न चावता अतिशय पटापट खातात. अशाप्रकारे, लवकर जेवण करण्याच्या सवयीमुळे त्यांचे पोट भरलेले असते. परंतु यामुळे त्यांना अन्न पचणे खूप कठीण होते. परिणामी, हळूहळू शरीरात चरबीचे प्रमाण वाढू लागते आणि लठ्ठपणा वाढू लागतो.

### आरोग्याचा विचार न करता खाणं


अनेकांना काम करताना काहीतरी खाण्याची सवय असते. या सवयीला बिंज इटिंग (binge eating) म्हणतात. असे लोक कुकीज, चिप्स आणि तळलेले पदार्थ खात राहतात. त्याचप्रमाणे ऑफिसमध्ये असताना चहा-कॉफी पिण्याची सवयही लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. या सवयींमुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण आणि चरबीचे प्रमाण वाढू लागते आणि या सर्वांमुळे लठ्ठपणा येतो.

### व्हिटॅमिन डीची कमतरता



ऑफिसमध्ये एसीत काम करणाऱ्या अनेकांना व्हिटॅमिन डी ची कमतरता असते. याचे मुख्य कारण हे लोक सूर्याच्या संपर्कात येतच नाहीत. यांना थेट सूर्याचं उन्ह सापडत नाहीत. सकाळी ऑफिसमध्ये गेल्यावर थेट संध्याकाळीच हे लोक ऑफिसमधून बाहेर येतात. या सगळ्यामुळे सूर्यप्रकाश लोकांच्या शरीरावर अजिबात पडत नाही आणि त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा मुख्य स्त्रोत आहे आणि सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे शरीरात व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियम दोन्हीची कमतरता होते. यामुळे हाडांशी संबंधित समस्या वाढू शकतात. यासोबतच लोकांमध्ये लठ्ठपणा वाढू लागतो. अनेक अभ्यासांमध्ये हे सिद्ध झाले आहे की, सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे लोकांमध्ये लठ्ठपणाचा धोका नियमितपणे सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असलेल्या लोकांपेक्षा अधिक वाढू शकतो.

## पोटातून नेहमी गुडगुड आवाज येतो?



सध्याच्या दैनंदिन जीवनात पोटाची समस्या एक सर्वसामान्य गोष्ट बनली आहे. पोटात सतत गॅस होणे, गुडगुड आवाज येणे किंवा सूज जाणवणे यामुळे अस्वस्थता वाढते. हा त्रास अनेकदा खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे होतो, पण कधी कधी तो जीवनशैलीतील इतर कारणांमुळेही होऊ शकतो. जे हा त्रास भोगत असतात त्यांना यातून काहीही करून सुटायचे असते. मग अशावेळी प्रश्न पडतो की या समस्येवर उपाय काय आहे?

- आले : आले पोटाच्या समस्यांसाठी एक प्रभावी उपाय आहे. आल्यामध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे पोटातील गॅस कमी करतात. आपण आल्याचा चहा किंवा साध्ये आले पाण्यात उकळवून तो पिऊ शकता. यामुळे पाचनक्रिया सुधारते आणि पोटात येणारे गुडगुड आवाज कमी होतात.
- दही : दहीमध्ये प्रोबायोटिक्स असतात, जे आपल्या पचनसंस्थेला मदत करतात. नियमित दही खाल्ल्याने आतड्यातील चांगल्या बॅक्टेरियांची वाढ होते, ज्यामुळे गॅसची समस्या कमी होते. पोटातील अस्वस्थता कमी करण्यासाठी दही एक उत्तम उपाय आहे. दहीसोबत कमी मसाल्याचा सलाड देखील पोटासाठी फायद्याचे आहे.
- ओवा : ओवामध्ये पाचक गुणधर्म असतात, जे पोटातील गॅस कमी करतात. ओवा पाण्यात उकळवून ते पाणी पिण्याने पोटदुखी आणि गॅसची समस्या कमी होते. तसेच, ओवा खाल्ल्याने पोटातील गुडगुडीचा आवाज कमी होतो. हा उपाय सोपा आणि घरगुती आहे, ज्यामुळे तुम्हाला लगेच आराम मिळतो.
- पुदीना : पेपरमिंट किंवा पुदिना हे पोटाच्या समस्यांसाठी उपयुक्त आहे. पेपरमिंटमध्ये



असलेले मेंथॉल पचनसंस्थेवर आरामकारक प्रभाव टाकते. पेपरमिंट टी किंवा ताज्या पुदिन्याच्या पानांचा वापर करून आपल्याला पोटदुखी आणि गॅसपासून आराम मिळतो. हा उपाय ताजेतवाना करणारा आहे आणि पोटाच्या सूजेसाठीही फायदेशीर आहे.
- पपई : पपईत असणारे एन्झाइम पोटातील गॅस आणि पचनाच्या समस्या कमी करण्यात मदत करतात. पपई खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते आणि गॅसची समस्या कमी होते. पपईचे नियमित सेवन केल्याने आपल्या पोटातील अस्वस्थता कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे गॅसच्या त्रासापासून आराम मिळतो.
- ॲप्पल सायडर व्हिनेगर : ॲप्पल सायडर व्हिनेगर पोटातील गॅस कमी करण्यासाठी उपयोगी आहे. एका कप पाण्यात एक चमचा एप्पल सायडर व्हिनेगर घालून प्यायल्याने पचन सुधारते आणि गॅसची समस्या कमी होते. हे उपाय पोटात असलेल्या गुडगुड आवाजावर नियंत्रण ठेवण्यातही मदत करतात. पोटात गॅस झाला तर या साध्या आणि नैसर्गिक उपायांचा जरूर विचार करा!

## डेंग्यूमध्ये पोटात का दुखतं?

**डेंग्यूच्या तापामुळे सामान्य ते अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. या परिस्थितीत अतिशय जास्त ताप येतो, ज्याला डेंग्यू मादा मच्छर एडीज इजिप्टी चावते त्याला हा ताप येतो. डेंग्यूमध्ये रक्तातील प्लेटलेट्स कमी होतात. डेंग्यू हा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पसरत नाही, परंतु एखाद्या संक्रमित व्यक्तीला डास चावल्यास आणि नंतर सामान्य व्यक्तीला चावल्यास डेंग्यूचा प्रसार होऊ शकतो. उलट्या, तीव्र डोकेदुखी, अंगदुखी, हाडे दुखणे, जास्त ताप ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे मानली जातात. परंतु काही प्रकरणांमध्ये डेंग्यू तापामुळे पोटदुखीचा त्रासही जाणवतो. जाणून घेऊया, डेंग्यू तापामध्ये पोटदुखीची कारणे कोणती आहेत?**

डेंग्यूची लक्षणे साधारणपणे २ ते ७ दिवस टिकतात. बहुतेक लोक एका आठवड्यानंतर बरे होतात. डेंग्यूच्या सामान्य लक्षणांसोबतच काही गंभीर लक्षणेही असू शकतात. यात पोटदुखी, रक्ताच्या उलट्या, स्टूलमध्ये रक्त येणे, अधिक अशक्त वाटणे या लक्षणांचा समावेश आहे. डेंग्यूचा डास चावल्यावर ताप, अंगदुखी अशी लक्षणे दिसतात. पण डेंग्यूमुळे पोटात दुखणे देखील होऊ शकते. काही रुग्णांच्या डेंग्यूमध्ये यकृताचा आकार वाढतो. ज्यामुळे पोटात जास्त पाणी असते. त्यामुळे डेंग्यूच्या रुग्णाला उलट्या होऊन पोटात दुखू लागते. डेंग्यूमध्ये प्लेटलेट्सही कमी होतात. डेंग्यूच्या रुग्णांना पोटदुखीचा त्रास जाणवू लागल्यास त्यांना तातडीने रुग्णालयात नेणे आवश्यक आहे. कारण कधी कधी ही परिस्थिती गंभीर देखील असू शकते. पोटदुखी हे डेंग्यूचे गंभीर लक्षण असू शकते. या अवस्थेत पोटाच्या उजव्या बाजूला सतत उलट्यांसह तीव्र वेदना होतात. डेंग्यूमध्ये ओटीपोटात दुखणे हे जाड पित्त मूत्राशय आणि सब्रोसल द्रवपदार्थ जमा झाल्यामुळे असू शकते. याशिवाय बद्धकोष्ठता, गॅस, पोटदुखीचा त्रास असला तरीही डेंग्यूमध्ये त्रास जाणवू शकतो.

### उपाय काय..?

- डेंग्यूमध्ये ओटीपोटात दुखत असल्यास तेलकट पदार्थांचे सेवन टाळा.
- जास्त तिखट मसाले आणि तळलेले पदार्थ खाऊ नका.
- मद्यपान आणि धूम्रपान देखील टाळा.



## पोटाच्या Colon Cancer ची लक्षणे

**तुम्हाला देखील दिवसभर पोट भरलेलं किंवा सतत पोटात गॅस जाणवतो? अनेकदा उपाशीपोटी असल्यामुळे देखील पोट भरल्यासारखं वाटतं. याला भूक हे एकमेव कारण नसू शकतं. जर तुम्हाला देखील गॅसचा किंवा पोट सतत भरल्यासारखं वाटत असल्याचा त्रास होत असेल तर हा आरोग्याशी संबंधित एक गंभीर आजार असू शकतो. काही विकार तुमच्या पोटाला आणि आतड्यांना प्रभावित करत असतात. ज्याचा थेट संबंध हा पचनसंस्थेशी असतो.**

- पोटात गॅस तयार होण्याचे कारण काय? : अनेक अनहेल्दी डाएट, एक्सरसाइजची कमतरता किंवा मसालेदार पदार्थांच सेवन हे याच मुख्य कारण असतं. कमी झोप, पोटाचा कॅन्सर, सूज, अतिसार, पोटदुखी आणि बद्धकोष्ठतेसारखे गंभीर आजाराचे हे कारण असू शकते. मात्र तुम्हाला कायमच गॅसच्या समस्येचा त्रास जाणवतो. अशावेळी तुम्ही लगेचच डॉक्टरांशी संपर्क साधून उपचार घेणे गरजेचे आहे.



- स्लीप एपनिया : नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या रिपोर्टनुसार, स्लीप एपनियाने पीडित असलेली लोकं कायमच तोंडाने श्वास घेतात. तसेच घोरताना देखील तोंडाने श्वास घेतात. जर तुम्हाला देखील स्लीप एपनिया असेल तर गॅसची समस्या जाणवू शकते. त्यामुळे तुम्हाला तोंडाने श्वास घेण्याची सवय असेल तर डॉक्टरांशी संपर्क साधणे गरजेचे आहे.
- कोलन कॅन्सर : पोटाच्या कॅन्सरचा आणि पोट फुगण्याचा घनिष्ट संबंध आहे. पोटाच्या कॅन्सर झाला असेल तर पोट फुगणे, सतत पोटाशी संबंधित त्रास, गॅस किंवा पोटदुखी सारखं Rectal Bleding सारखी लक्षणे दिसत आहेत. यामुळे या लक्षणांबाबत खूप सतर्क राहा. पोटाशी संबंधित कोणत्याही त्रासाकडे दुर्लक्ष करू नका. जर हा त्रास पुन्हा पुन्हा होत असेल तर डॉक्टरशी संपर्क साधणे गरजेचे आहे.
- इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (IBS) : इरिटेबल बॉवेल सिंड्रोमसारख्या आजाराला IBS देखील म्हटले जाते. पोटदुखी, अतिसार, बद्धकोष्ठता, सूज आणि गॅससारखा त्रास होतो. IBS ने त्रस्त व्यक्ती कायम गॅसचा त्रास होत असल्याचं सांगत असते. लक्षात ठेवा ही समस्या एका दिवसाची असू शकत नाही. त्यामुळे त्यावर नियंत्रण किंवा उपचार करण्यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.
- गोळा येणे, अतिसार, ओटीपोटात दुखणे आणि बद्धकोष्ठता : डायव्हर्टिकुलोसिस रोगाच्या लक्षणांमध्ये सूज येणे, अतिसार, ओटीपोटात दुखणे आणि बद्धकोष्ठता यांचा समावेश असू शकतो. ओटीपोटात अस्वस्थता जी सामान्यतः खूप तीव्र असते आणि अनेकदा वायूसोबत जाणवू शकते हे डायव्हर्टिकुलोसिसच्या सर्वात सामान्य लक्षणांपैकी एक आहे. तज्ज्ञांच्या मते, या परिस्थितीचे नेमके कारण अद्याप माहित नाही; परंतु उपचारांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे चांगले आहे.
- हायपोथायरॉईडीझम : थायरॉईडच्या बिघडलेल्या कार्यामुळे देखील पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. हायपोथायरॉईडीझमच्या बाबतीत, एखाद्या व्यक्तीच्या पोटातून आणि आतड्यांमधून अन्न जाणे मंद होते. या समस्येमध्ये पचन मंद झाल्याने छातीत जळजळ, बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि गॅससारखी लक्षणे दिसू शकतात.

## फॅटी लिव्हरसारखे जीवघेणे आजार

**शरीराच्या काही भागांमध्ये होणारी दुखापत अतिशय सामान्य गोष्ट आहे. प्रत्येकजण याचा कधी ना कधी अनुभव घेत असतो. असा त्रास कधी कधी जास्त फिजिकल ॲक्टिविटी केल्यामुळे, आहारात बदल झाल्यामुळे देखील होतो. या त्रासाला आपण सुरुवातीला अजिबात गांभीर्याने घेत नाही. मात्र तुम्हाला माहीत आहे का, हीच जीवघेण्या आजाराची लक्षणेदेखील असू शकतात. दुखणे सुरू होताच डॉक्टरांकडे गेला नाहीत, तरी वेदनांची तीव्रता आणि त्या जागेवर विशेष लक्ष ठेवा. जेणेकरून त्यामधील बदलाकडे लक्ष ठेवू शकता. ओटीपोटात वेदना गोंधळ निर्माण करू शकतो. हे अनेक आरोग्य समस्यांचे लक्षण असू शकते. आज आम्ही तुम्हाला याची संभाव्य कारणे सांगत आहोत.**

- फॅटी लिव्हर संबंधीत आजार : यकृतामध्ये जास्त चरबी जमा झाल्यास फॅटी लिव्हर रोग होतो. मात्र, हा आजार लिव्हर सिरोसिस होईपर्यंत त्याच्या रुग्णांमध्ये लक्षणे दिसत नाहीत. परंतु लक्षणांमध्ये ओटीपोटात दुखणे किंवा ओटीपोटाच्या वरच्या उजव्या बाजूला पूर्णपणाची भावना असू शकते.
- अपेंडिक्स : अपेंडिक्स ही एक लहान पिशवी आहे जी तुमच्या पोटाच्या खालच्या उजव्या बाजूला कोलनपासून लटकते. यामध्ये जळजळ होण्यास अपेंडिसाइटिस म्हणतात. ज्याची लक्षणे म्हणजे पोटदुखी, जी तुमच्या पोटाच्या मध्यभागी सुरू होते आणि उजव्या हाताच्या खालच्या बाजूकडे जाते.
- कॅन्सर : काही प्रकारची कर्करोगाची लक्षणे पोटाच्या वरच्या भागात वेदनांच्या स्वरूपात दिसून येतात. स्वादुपिंडाचा कर्करोग,



पोटाचा कर्करोग, यकृताचा कर्करोग यांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो. अशा परिस्थितीत पोटाच्या या भागात बराच काळ दुखत असेल तर त्याला हलके घेऊ नका.
- किडनीचा त्रास : मूत्रपिंड पोटाच्या वरच्या उजव्या बाजूला स्थित आहे. त्यामुळे किडनीमध्ये बिघाड झाल्याने या भागात वेदना होऊ शकतात. यामध्ये किडनी इन्फेक्शन आणि किडनी स्टोन यांसारख्या किडनीच्या आजारांचाही समावेश होतो.
- होऊ शकतो हा आजार : ओटीपोटाच्या वरच्या उजव्या बाजूला दुखण्याचे कारण पित्ताशयातील खडे, पित्ताशयाशी संबंधित समस्यांमुळे होऊ शकते. पोटदुखीच्या दुखण्यामुळे चिडचिड आंत्र सिंड्रोम, बद्धकोष्ठता, अन्न ॲलर्जी, लॅक्टोज असहिष्णुता, अन्न विषबाधा आणि पोट संसर्ग यांचा समावेश होतो.

## लहान मुलांच्या पोटदुखीची कारणे

- जंत : पोटदुखीसोबत शीच्या जागे भोवती खाज येणे, वळवळल्या सारखे वाटणे अशी लक्षणे दिसतात. काही जंतांमुळे रक्त कमी होऊ शकते. यासाठी अल्बेंडेझोल व आयवमेक्टीन या गोळ्या वर्षातून एकदा मुलांना देण्यास हरकत नाही. यासाठी आपल्या देशात सर्व मुलांना १० फेब्रुवारी व १० ऑगस्ट या दिवशी एक जंताची गोळी दिली जाते. मात्र पोट दुखते म्हणून वारंवार जंताची गोळी देणे चुकीचे आहे. गोड खाल्ल्यामुळे जंत होतात, झोपेत दात खाणे व चेहऱ्यावर पांढरे चट्टे हे जंताची लक्षणे आहेत हा गैरसमज आहे.
- बद्धकोष्ठता : पोटदुखी असताना मुलाला रोज नियमित मलनिस्सारण होते आहे की नाही हे तपासणे गरजेचे असते. आहार सुधारला की बद्धकोष्ठता कमी होते.
- संसर्ग : अपेंडीसायटीस आणि हिपॅटायटीस (कावीळ) हे दोन संसर्ग पोटदुखीसाठी कारणीभूत असतात. दोन्ही संसर्गात पोटाच्या उजव्या बाजूला तीव्र वेदना असतात. काविळीत वेदना वरच्या बाजूला तर अपेंडीसायटीसमध्ये खालच्या बाजूला होतात. दोन्ही मध्ये ताप व उलट्यांचा त्रास होतो.
- शस्त्रक्रियेसाठीची कारणे : आतड्यांमध्ये अडथळा किंवा एकमेकात अडकणे या तातडीने शस्त्रक्रियेसाठी काही कारणे असतात. यात उलट्या व सतत पोट दुखणे, मल विसर्जनासोबत रक्त पडणे अशी लक्षणे दिसतात.
- ॲसिडिटी व अपचन : लहान मुलांनाही याचा त्रास होऊ शकतो व यामुळे पोटाच्या वरच्या भागात मध्यावर पोट दुखते.
- जुलाब व उलट्या : गॅस्ट्रोएनटेरायटीसमध्ये जुलाब आणि उलट्यांसोबत पोटदुखीचा ही त्रास होतो.

## शॉर्ट न्यूज

### मनपा आयुक्तांनी घेतला आढावा

**नगर :** राज्य शासनाने अहिल्यानगर शहरातील विविध प्रभागांत कामांसाठी दिलेल्या सुमारे ८४ कोटी रुपयांच्या निधीतील सर्व ११४ कामे सुरू झाली आहेत.यातील ५०टक्के कामे पूर्णही करण्यात आली आहेत. उर्वरित कामे येत्या तीन महिन्यांत पूर्ण होतील. त्यादृष्टीने महानगरपालिकेने नियोजन केल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा देणे या लेखाशीर्षांतर्गत सुमारे ८४ कोटी रुपयांचा निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे.

### राजूरला साकारणार पिचड यांच्या नावाचे प्रवेशद्वार

**अकोले :** माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या नावाने राजुर येथे प्रवेशद्वार बांधण्याचा ठराव राजूर ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीमध्ये सर्वानुमते घेण्यात आला, अशी माहिती उप सरपंच संतोष बनसोडे यांनी दिली. राजुर ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी राजुर येथे प्रवेशद्वार बांधून, त्याला माजी मंत्री, आदिवासी हृदय सम्राट स्व. मधुकरराव पिचड यांचे नाव देण्याचा एकमताने ठराव मंजुर केला. ग्रामपंचायत कार्यालयात पिचड यांची प्रतिमा कायमस्वरूपी लावण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला.

### गांजा बाळगणाऱ्या तरुणास अटक

**बाभळेश्वर :** श्रीरामपूर रस्त्यावर २८ डिसेंबर रोजी रात्री पेट्रोलिंग करत असताना पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या तरुणाकडे पाच किलो गांजा आढळून आला. साबीर रमजान शेख असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याविरोधात लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. पेट्रोलिंग पथकाने साबीर शेख यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्या बॅगमध्ये ५ किलो वजनाचा गांजा आढळून आला. याप्रकरणी पुढील तपास लोणी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास वाघ हे करत आहेत.

### शासकीय कार्यालयात व्हिलचेअरची सोय करा

**शेवगाव :** दिव्यांग अधिकार अधिनियम-२०१६मधील तरतुदीनुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयात दिव्यांग व्यक्तींना सुलभपणे वावर करता यावा, यासाठी सर्व सुविधा पुरवणे बंधनकारक केलेले आहे. असे असताना तहसील कार्यालयासह इतर कार्यालयात दिव्यांग व्यक्तीसाठी व्हिलचेअर नाही. याबाबत सतत पाठपुरावा करीत असूनही आमच्या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत सावली दिव्यांग संघटनेचे शेवगाव तालुकाध्यक्ष चांद शेख यांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांची १५ लाखांची फसवणूक

**संगमनेर :** गुजरातच्या दोघा व्यापाऱ्यांनी संगमनेरमधील शेतमाल विक्रेत्याची १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संगमनेर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज भारवाड व सुरेश भारती अशी गुजरातच्या व्यापाऱ्यांची नावे आहेत. फिर्यादीत म्हटले आहे की, पाच वर्षांपासून पांडुरंग माधव चांडे हे त्यांचे भागीदार असून दोघेही शेतमाल बाहेरील राज्यात विक्रीसाठी पाठवतात. दोन वर्षांपूर्वी अहमदाबाद येथील मनोज भारवाड व सुरेश भारती यांच्याशी या शेतकऱ्यांची ओळख झाली.

# स्नेहालयमधील सेवा संवर्धन कार्यशाळेस प्रारंभ

**■ राज्यातील ५० सामाजिक संस्थांचा सहभाग**
**■ विविध मान्यवरांचे लाभले मार्गदर्शन**

**नगर : प्रतिनिधी**



**स्नेहालय संस्थेने आयोजित केलेल्या ३ दिवसांच्या निवासी सेवा संवर्धन कार्यशाळेचे उद्घाटन सत्र संपन्न झाले. ही कार्यशाळा पुढील तीन दिवस स्नेहालय संस्थेमध्ये सुरु असणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील ५० सामाजिक संस्थांचे संस्थापक सहभागी झाले असल्याचे कार्यशाळेचे निमंत्रक स्नेहालयाचे विश्वस्त शशिकांत सातभाई यांनी सांगितले.**

स्नेहालय संस्थेचे पालक मिलिंद कुलकर्णी यांनी स्वागत प्रसंगी ''सर्व समविचारी संस्था एकत्रित येऊन एक विचाराने काम करतील, तेव्हा अनेक सामाजिक कार्य उत्तमरीत्या पार पाडू शकतात.'' असे विचार व्यक्त केले. तसेच विश्वस्त राजीव गुजर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले, यावेळी स्नेहालय संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल गावडे आणि कार्यशाळेतील सहभागी संस्थांचे प्रमुख आदी उपस्थित होते.

विशिष्ट सामाजिक उद्दिष्टांसाठी भारतात सर्वाधिक सामाजिक संस्था आणि संघटना महाराष्ट्रात स्थापन केल्या गेल्या. आजही महाराष्ट्र राज्य यात अग्रणीच आहे. तथापि विशेषतः नवोदित संस्थांना सेवाकार्याचे व्यवस्थापन, ध्येय उद्दिष्टांची स्पष्टता, संस्थेची मूल्यप्रणाली , बाह्य आणि अंतर्गत अनुपालन, कामाचे नियोजन, मानवी आणि आर्थिक संसाधनांचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा उपयोग, संस्थांतर्गत प्रक्रियांचे दृढीकरण, समाज माध्यमांचा वापर आणि प्रसिद्धी तंत्र, निधी संकलन आणि आर्थिक व्यवस्थापन, संघटन शास्त्र , विविध स्वरूपाच्या अधिस्वीकृती - अनुन्याप्ती आणि परवाने यांची प्राप्ती, कामाची कायदेशीर चौकट इत्यादी विषयांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण आवश्यक असते.

संस्था उभारणीपेक्षाही सामाजिक प्रश्नावरील मूलभूत आणि समन्वयीत काम स्नेहालयने नेहमीच महत्त्वाचे मानले. त्यामुळे आपल्यासारख्या असंख्य सामाजिक उपक्रमांची आणि संस्थांची उभारणी करण्यासाठी निरपेक्ष योगदान देणे हे स्नेहालयच्या कार्याचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

अनौपचारिक स्वरूपात असंख्य संस्थांना क्षमता विकासासाठी स्नेहालय गेली तीन दशके मदत करीत आले. तथापि या विषयावर सातत्यपूर्ण प्रशिक्षण सेवा संवर्धन कार्यशाळेच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे.

कार्यशाळेत व्यवस्थापन तज्ञ शशिकांत सातभाई, माध्यमतज्ञ रीमा अमरापुरकर, बजाज फिन्सर्वचे निवृत्त सामाजिक दायित्व विभाग प्रमुख अजय साठे, सेवाकार्याचे अभ्यासक हर्षु घाटे, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे संचालक प्रा. डॉ. रमेश जारे आदी १४ तज्ञ संवादक सहभागी झाले आहेत.

श्रीमती जया जोगदंड, अनिल गावडे , डॉ. प्रीती भोम्बे, संजय गुगळे, गीता कौर, हनीफ शेख, संजय चाबुकस्वार, अजित जगताप, विकास सुतार आदींनी या उपक्रमाचे संयोजन केले. यापुढे भविष्यात अशा ५ दिवसांच्या निवासी कार्यशाळा सातत्याने आयोजित केल्या जाणार असून प्रत्येक तुकडीत ५० संस्था प्रतिनिधींना प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# अभिनेत्री प्राजक्ता माळीने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**



**बीड येथील मोर्चात मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या नावाचा उल्लेख केला होता. इव्हेंट पॉलिटिक्स शिकायचे असेल तर बीडमधून शिका या संदर्भात बोलताना आमदार सुरेश धस यांनी काही अभिनेत्रींचा उल्लेख केला त्यात प्राजक्ता माळीचा देखील होता. यावरून प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेत जाहीर माफी मागण्याचे आव्हान धस यांना केले आहे.**

प्राजक्ता माळीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटण्यासाठी वेळ मागितली होती. त्यानुसार आता प्राजक्ता माळी आणि देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर भेट झाली आहे. यावेळी प्राजक्ता माळीने मुख्यमंत्र्यांना निवेदन देत आमदार सुरेश धस यांनी माफी मागावी अशी मागणी केली आहे. तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याची देखील मागणी करण्यात आली असल्याचे बोलले जात आहे. यावर देवेंद्र फडणवीस यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे समजते.

प्राजक्ता माळी यांच्या भेटीनंतर देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, त्यांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेतले जाणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल. त्यांच्या विरोधात यूट्यूबवर काही लोक आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करत आहेत, अशी तक्रार त्यांनी केली आहे. त्या सर्वांवर कारवाई करण्याचे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

दरम्यान, भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी आमदार सुरेश धस यांच्यावर टीका केली आहे. चंद्रकांत पाटील म्हणाले, शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवावा. कोणत्याही महिलेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडणार नाहीत, याची काळजी घ्यावी, असा सल्ला चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे.

# राज्यात भाजपाचे दीड कोटी सदस्य बनवणार

**प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्धार**
**नड्डा यांनी केला बावनकुळे यांचा सत्कार**

**मुंबई : प्रतिनिधी**



**महाराष्ट्रात भाजपाचे दीड कोटी सदस्य करू, असा निर्धार प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व अभियानाच्या नवी दिल्लीतील केंद्रीय कार्यशाळेत व्यक्त केला. दरम्यान, याच कार्यशाळेत महाराष्ट्रातील अभूतपूर्व विजयाबद्दल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांच्या उपस्थितीत रविवारी दिवसभर ही कार्यशाळा झाली. संघटनेच्या विस्तारावर देशव्यापी चर्चा झाली. देशभरातील सर्व राज्यांचे प्रदेश अध्यक्ष, प्रदेश प्रभारी, संघटन मंत्री, प्रमुख पदाधिकारी व केंद्रीय पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील अभूतपूर्व विजयाबद्दल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी बावनकुळे यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. पक्षाचे मुंबई अध्यक्ष श्री आशीष शेलार यांचाही सत्कार करण्यात आला.

राज्यात सुरु झालेले सदस्यता नोंदणी अभियान व त्या विषयाचे नियोजन याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सविस्तर निवेदन व सादरीकरण केले. १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान अभियान राज्यभरात राबविणार असून, पाच जानेवारीला विशेष अभियान घेण्यात येणार असल्याचे सांगून ते म्हणाले, मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्षांपासून बूथ कार्यकर्त्यापर्यंत संपूर्ण संघटना बूथ वर सदस्यता नोंदणी करणार आहे. नवीन वर्षात १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे महाराष्ट्र प्रदेश महा अधिवेशन घेण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, आजचा हा क्षण माझ्यासाठी अभिमानाचा तर आहेच आहे, पण पार्टीने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांवर टाकलेला विश्वास सार्थ ठरवणारा, पार्टी नेतृत्वाने दिलेल्या दायित्वाची पूर्णतः करणारा तसेच फलश्रुती असलेला आहे.आजचा सत्काराचा क्षण मी माझ्या मनात जपून ठेवत आहे. हा सन्मान मी माझ्या कार्यकर्त्यांना अर्पण करतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमितभाई शाह, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डाजी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कष्टाचा माझ्या आजच्या यशात खूप मोठा वाटा आहे, याची मला जाणीव आहे. त्यांचेही मनापासून आभार व्यक्त करतो तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे मार्गदर्शन मला मोलाचे ठरले अशी भावना बावनकुळे यांनी व्यक्त केली.

**वाचकांच्या लेखणीतून**

# ज़िंदगी का साज़

लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ अशी हळहळ वाटणारी बातमी वाचली (पारनेर दर्शन, २८ डिसेंबर, शनिवार).

जिल्ह्यात सुरू असलेल्या सांस्कृतिक कला केंद्रामध्ये डीजेचा वापर होत असल्याने लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. म्हणून डिजेवर बंदी घालावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोक कालावंतांनी आंदोलन केले. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आल्याचे कळते.

सांस्कृतिक कला केंद्रामध्ये डीजे आणि टेपरेकॉर्डर या वाद्यांचा सर्रास वापर होत असल्याने ढोलकी, तबला, पेटी वादक लोक कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे या वाद्यांवर बंदी घालण्यात यावी अशी आंदोलकांनी मागणी केलेली आहे. ती रास्तच म्हणावी लागेल.

सनई, चौघडा, ढोलकी, हलगी आशी आपली किती तरी पारंपरिक वाद्ये आहेत. ती श्रवणीय आहेत. पाश्चात्य वाद्येही श्रवणीय आहेत. नाही असे नाही. परंतु आपल्या श्रवणीय वाद्यांचे करायचे काय? त्यांना अडगळीत टाकता येणार नाही. या वाद्यांना किंवा साजांना नावारुपाला आणण्यात आपल्या कैक पिढ्या खपल्या आहेत. तब



कहीं जाकर इन साज़ों पर ये रंग चढ़ा है असे समजणे वावगे ठरणार नाही.

पाश्चात्य डीजेसारख्या कर्णकर्कश साजांमुळे माणसांची श्रवणशक्ती अधू किंवा कायमची नष्ट झालेली असल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत.

जिंदगी का साज़ भी क्या साज़ है।
बजता है मगर बेआवाज़ है।।

जीवनाचे वाद्य पण काय वाद्य आहे! वाजते परंतु आवाज येत नाही!!

रोजीरोटी मिळवून देणाऱ्या आणि कलेची बूज राखणाऱ्या आंदोलक लोक कलावंतांच्या खडतर जीवनाला पारनेर दर्शनने प्रतिसाद दिलेला आहे. जिल्हाधिकारीही त्याचा आब राखतील, अशी अपेक्षा आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### फडणवीस इन ॲक्शन!

एकाधिकारशाही निर्माण होणार नाही याची काळजी फडणवीसांनी घ्यावी, असे अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटते.

२०१९ ते २०२४ या कालावधीत राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडल्या. न भूतो न भविष्यती अशा घटना पाहायला मिळाल्या. आधी महाविकास आघाडीचं सरकार असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या निकटवर्तीयांना मोठी पदं, जबाबदाऱ्या मिळाल्या. त्यानंतर २०२२ मध्ये एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वात युतीचं सरकार आलं. या कालावधीत बहुतांश जुन्या अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदं देण्यात आली, असं टाईम्स ऑफ इंडियानं वृत्तात म्हटलं आहे. आता फडणवीसांकडे मुख्यमंत्रिपदासह गृहमंत्रिपदही असल्यानं पोलिसांच्या बदल्यांवरही त्यांचा कंट्रोल असेल. २०१९ ते २०२४ या कालावधीत अशी परिस्थिती नव्हती. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री वेगवेगळ्या पक्षाचे असल्यानं अनेकदा पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरुन सरकारमध्ये खटके उडाले.

### प्राजक्ताच्या तक्रारीची महिला आयोगाकडून दखल

व बदनामीकारक विधान तसेच त्यांनंतर सोशल मीडियावर प्रसिद्ध होत असलेल्या बदनामीकारक बातम्या यामुळे त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनावर त्याचे परिणाम होत असल्याचे त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

''सदर प्रकरण अतिशय गंभीर स्वरूपाचे असून महिलेच्या प्रतिष्ठेस बाधा पोहोचवणारे असल्याने राज्य महिला आयोगानेमुंबईपोलीस आयुक्त यांना याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले असून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची सूचना केली आहे'', असे महिला आयोगाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

**सुरेश धस म्हणाले...**

दरम्यान माध्यमांशी बोलत असताना सुरेश धस यांना महिला आयोग आणि प्राजक्ता माळी यांच्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. मात्र त्यांनी यावर भाष्य करणे टाळले. माझ्यासाठी हा विषय संपला असून संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणा व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही विषयावर बोलणार नसल्याचे त्यांनी म्हटले.

### महाराष्ट्राच्या मनात आहे, ते दोन्ही पवार करतील!

दिवसांत घडल्या आहेत. शरद पवार यांच्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी शरद पवारांच्या दिल्लीतील निवासस्थानी अजित पवार, सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल यांच्यासह पार्थ पवार पोहचले होते. त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एक होणार अशी चर्चा सुरु झाली आहे.

**काय म्हणाले चेतन तुपे?**

त्यानंतर आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे हडपसर विधासभा मतदारसंघाचे आमदार चेतन तुपे हे शरद पवार यांच्या पुण्यातील मोदीबाग या निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी आले होते. या भेटीनंतर चेतन तुपे यांनी केलेल्या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. सगळ्या महाराष्ट्राची जी इच्छा आहे ते दोन्ही पवार करतील असं चेतन तुपे हे शरद पवार यांच्या भेटीनंतर बोलल्याने पुन्हा एकदा दोन्ही पवार एक होणार का, ही चर्चा सुरू झाली आहे. चेतन तुपे आज रयत शिक्षण संस्थेच्या कामासाठी शरद पवार यांना भेटण्यासाठी आले होते त्यानंतर त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

शरद पवारांच्या भेटीनंतर चेतन तुपे म्हणाले, साहेब आमच्या सर्वांचेच आहेत. साहेब आमच्या घरातील व्यक्ती असल्यासारखे आहेत. कायम राजकारण हा विषय नसतो साहेबांचे आणि माझे कौटुंबिक संबंध आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीला राजकारणाशी जोडू नये. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली माझे वडील विठ्ठल तुपे असतील किंवा अजित दादांच्या नेतृत्वाखाली मी असेच शिकलो आहे की राजकारण हा केवळ एक महिन्यापुरता विषय असतो. एवढा एक महिन्यापूर्वी राजकारण करायचे असते आणि त्यानंतर विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकायचे असतात. त्यामुळे साहेबांची माझ्या वडिलांची आणि दादांची जी शिकवण आहे त्यानुसार प्रत्येक गोष्टीत आम्ही राजकारण पाहत नाही.

तर, दोन राष्ट्रवादी एकत्र यावेत हा निर्णय मोठ्या पातळीवरचा आहे एक छोटा कार्यकर्ता आहे. दोन्ही पवार नेहमी सांगतात, एकमेकांना भेटतात वाढदिवसाच्या एकमेकांना शुभेच्छा देतात त्यामुळे सगळ्या महाराष्ट्राची इच्छा आहे ती ते करतील. असे देखील तुपे म्हणाले आहेत.

**सुनंदा पवार यांनी देखील केली होती इच्छा व्यक्त**

अजित पवार आणि शरद पवार यांच्या दोन्ही गटाने अर्थात राष्ट्रवादीने एकत्र येण्याची गरज आहे, मूठ घट्ट राहिली पाहिजे, असं वक्तव्य शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांनी केले होत. कुटुंब म्हणून आता एकत्र येण्याची गरज असल्याचेही सुनंदा पवार म्हणाल्या होत्या.

# आ. दातेंकडून पिंपळगाव जोगा कालव्याची पाहणी

## ■ पारनेर लाभक्षेत्रात पूर्ण पाणी मिळेपर्यंत पाणी चालू ठेवण्याचे आदेश
## ■ शेतकऱ्यांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेत योग्य नियोजनाच्या अधिकाऱ्यांना सुचना

अळकुटी : प्रतिनिधी

**पिंपळगाव जोगा कालव्याच्या पारनेर तालुका हद्दीतील आवर्तना बाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेत अळकुटी ते कळस पर्यंतच्या कालव्याची पाहणी करत पारनेर तालुका हद्दीतील आवर्तनाचे योग्य नियोजन करून योग्य दाबाने पाणीपुरवठा करण्याचे तसेच पारनेरच्या लाभक्षेत्राला पूर्ण पाणी मिळेपर्यंत पाणी चालू ठेवण्याचे आदेश आमदार काशिनाथ दाते यांनी पिंपळगाव जोगा पाटबंधारे अधिकाऱ्यांना दिले.**

यावेळी प्रदेश भाजपा कार्यकारीणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष वसंत चेडे, विश्वनाथ चौधरी, पिंपळगाव जोगा पाटबंधारे उपविभागीय अधिकारी तान्हाजी खाडे, सुहास साळवे, पाटबंधारे कर्मचारी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पिंपळगाव जोगा पारनेर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना कांदा तसेच अन्य पिकांना पाण्याची टंचाई जाणवू लागल्याने आवर्तन सोडण्याची मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचेकडे केली होती. संबंधितांनी तत्काळ पाटबंधारे अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाणी सोडण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यानुसार पिंपळगाव जोगाचे आवर्तन सोडण्यात आले. पारनेर तालुका हद्दीत दि. १९ रोजी पाणी आले असून अद्यापही योग्य दाबाने पाणी पुरवठा होत नसल्याची तसेच पाणी चोरीचे प्रमाण वाढल्याची तक्रार अळकुटीतील तालुका भाजपाचे उपाध्यक्ष अतुल माने, जिल्हा कार्यकारणी सदस्य किसन शिंदे, अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष असिफ मोमीन, दिपक परंडवाल, दत्तात्रय परंडवाल, राहुल नरड, प्रदिप घोलप, संतोष माने, अशोक परंडवाल, अतुल घोलप, रुपेश घोलप तसेच लाभधारक शेतकऱ्यांनी केली होती. त्याची तत्काळ दखल घेत आमदार दाते यांनी अळकुटी ते कळस या भागात आवर्तनाच्या पाण्याची तसेच कालव्याची पाहणी केली.

यावेळी पाण्याचा कमी दाबाने होणारा पुरवठा, कालव्यातील वाढलेली झाडे झुडपे व कचरा सफाई न झाल्याने पाण्याच्या प्रवाहात येणारे अडथळे याविषयी अधिकाऱ्यांना विचारलेल्या प्रश्नावर कालवा सफाई मेंटेनस विभागाची जबाबदारी असल्याचे सारवासारवीची उत्तरे मिळाल्याने आमदार दाते यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी करत गेल्या चार वर्षांतील ढिसाळ कारभारामुळे पाणी नियोजनाकडे दुर्लक्ष झाल्याचे सांगत मेंटेनस विभागावर अवलंबून न राहता मजुरांच्या सहाय्याने आवर्तन संपल्यावर युद्धपातळीवर कालव्याच्या सफाईच्या सुचना दिल्या. तसेच पाण्याचे योग्य नियोजन करून पारनेर लाभक्षेत्राला पूर्ण पाणी मिळेपर्यंत पाणी चालू ठेवण्याचे आदेश दिले.

यावेळी पाडळीचे तुकाराम येवले, अंकुश गावडे तसेच अन्य शेतकऱ्यांनी पाडळी येथे एस.के. एफ. ची मागणी आमदार दाते यांचेकडे केली याची दखल घेत जागेची पाहणी करण्याच्या सुचना दाते यांनी दिल्या.



■ अळकुटी येथे पिंपळगाव जोगा कालव्याच्या आवर्तनाची पाहणी करताना आमदार काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, उपविभागीय अधिकारी तान्हाजी खाडे तसेच शेतकरी.(छायाः मंगेश पारखे )

### कालव्याच्या अस्तरीकरणाशिवाय प्रश्न सुटणार नाही

पिंपळगाव जोगा कालव्याच्या ७३ किमी लांबी पैकी ५७ किमीचे अस्तरीकरण झाले असून पारनेर तालुका हद्दीतील १६ किमीचे अस्तरीकरणाचे काम बाकी आहे. अस्तरीकरण नसल्याने पाणी मोठ्या प्रमाणात जमीनीत जिरत असून त्याचा परिणाम पाण्याच्या दाबावर व प्रवाहावर होत असल्याने पाणी टेल टँक पर्यंत पोहचण्यास उशीर होतो. उर्वरीत कालव्याचे अस्तरीकरण झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नसून गेली चार वर्षातच अस्तरीकरण होणे गरजेचे होते परंतू ढिसाळ कारभारामुळे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे आमदार दाते यांनी सांगत उर्वरीत १६ किमी कालव्याच्या अस्तरीकरणाचे इस्टीमेट करून युद्धपातळीवर अस्तरीकरणाच्या कामास गती देण्याच्या सुचना अधिकारी खाडे यांना दिल्या.

### कार्यालय अळकुटीत कारभार मात्र नारायणगावहून

पिंपळगाव जोगा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय कार्यालय अळकुटी येथे असून येथे उपविभागीय अधिकारी, सहाय्यक अधिकारी तसेच अनेक कर्मचाऱ्यांची नियुक्ती असूनही केवळ १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला ध्वजवंदनालाच सर्व स्टाफ हजर असतो इतरवेळी मात्र या कार्यालयात शुकशुकाटच दिसत असून बहुतांश वेळा कार्यालयीन वेळेतही या कार्यालयास कुलूप असल्याचे निदर्शनास आले असल्याची तक्रार शेतकऱ्यांमधून होत असून कार्यालय अळकुटीत असूनही कामानिमित्त शेतकऱ्यांना नारायणगाव (पुणे) येथील कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असून कार्यालय अळकुटीत कारभार मात्र नारायणगाव येथून होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी यावेळी केली.

### कामांची पुर्तता केवळ कागदावरच

मागील काळात कालवा दुरुस्ती, सफाई व योग्य दाबाने पाणी पुरवठा याकडे तसेच पुणे जिल्हयातील शेतकऱ्यांची दबंगगिरी करत मोठ्या प्रमाणात पाणी चोरी याकडे दुर्लक्ष झाले असून या कामांची पुर्तता केवळ कागदावरच झाल्याचे दिसून येत असून पारनेर तालुक्याच्या हक्काचे पाणी शेतकऱ्यांना मिळण्यासाठी यापुढील काळात अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

**विश्वनाथ कोरडे**
भाजपा कार्यकारीणी सदस्य

---

# पब्लिक स्कुलच्या आनंदबाजारात व्यवहार ज्ञानाचे धडे!

## ३५७ स्टॉलवर खरेदी विक्रीची धुम

पारनेर : प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार ज्ञानाचे धडे मिळावेत या हेतूने पारनेर पब्लिक स्कुलमध्ये शनिवारी आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. पहिली ते नववीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी या बाजारात विविध पदार्थ, फळे, कडधान्य आदींचे ३५७ स्टॉल लावत आपल्या वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांना आकर्षित केले.**

पारनेर पब्लिक स्कुलमध्ये सोमवार दि.२३ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान शैक्षणिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून त्याचाच एक भाग म्हणून शनिवारी आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

आपल्याच वस्तू किती दर्जेदार आहेत याचे मार्केटींग करीत विद्यार्थी आपल्या वस्तू ग्राहकांना विक्री करत होते. आनंद बाजारास पारनेर परिसरातील अनेक मान्यवरांनी भेट देत खरेदीचा आनंद लुटला. अनेक पालकांनीही विद्यार्थ्यांच्या मालाची खरेदी करत त्यांचा आनंद व्दिगुणीत केला. विद्यालयाच्या अध्यक्षा सविता म्हस्के, प्राचार्य गिताराम म्हस्के हे यावेळी उपस्थित होते. आनंद बाजार यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. दिपक जाधव, शंभूनाथ रंधवे यांनी सुत्रसंचलन तर सचिन मोढवे यांनी आभार मानले.



■ पारनेर पब्लिक स्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आनंद बाजारात ३५७ स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यवहार ज्ञानाचे धडे घेतले.

### काय होते आनंद बाजारात ?

वडा पाव, भजी पाव, इडली सांबर, गुलाब जाम, ओली-सुकी भेळ, पाव भाजी, थालीपीठ, शेवती, व्हेज मंच्युरिअन, मसाला पापड, सँडविच, चहा, कॉफी, दहीवडा, पेढे, बिस्किटे, पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्ये.

### हेतू सफल झाल्याचे समाधान

स्व. इंद्रभान डांगे यांच्या संकल्पनेतून आनंद बाजाराचे आयोजन करण्यात येत असून बाल वयातच निरनिराळया संकल्पना, प्रयोग राबवून शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारीक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळते. आनंद मेळाव्याच्या निमित्ताने हा हेतू सफल झाला याचे समाधान आहे.

**गितराम म्हस्के**
प्राचार्य

---

# मायडियाकडून कौडेश्वर ग्रंथालयात बुक केसची भेट

## सामाजिक दायित्व निधीतून ४५ हजारांचा निधी

सुपा : प्रतिनिधी

**सुपा-पारनेर विस्तारीत औद्योगिक वसाहतीमधील कॅरियर मायडिया या बहुराष्ट्रीय कंपनीकडून शहंजापुर येथील कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयास सामाजिक दायित्व निधीतून ४५ हजार रूपये किमतीच्या तीन बुक केस भेट देण्यात आल्या.**

कंपनीचे मुख्य व्यवस्थापक जगदेव सिंग, सीजीएम मंगेश तराले, मनुष्यबळ व्यवस्थापक कपील धुमाळ, दळणवळण व्यवस्थापक कृष्णकांत टकले, उपव्यवस्थापक मनोज तरटे यांनी या बुक केस ग्रंथालयाच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केल्या.

मायडिया या कंपनीने तरूणांना मोठया प्रमाणावर रोजगार देण्याबरोबरच सामाजिक दायित्व निधीतून सुपा परीसरातील विविध गावांमध्ये विविध माध्यमातून मदतीचा हात दिला आहे. शाळांमधील सुविधांबरोबरच आरोग्य शिबिरांचेही आयोजन करण्यात येते. सामाजिक जाणीवेबरोबरच कंपनीमधील कर्मचाऱ्यांचे आरोग्य, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठीही कंपनीच्या वतीने हातभार लावला जातो.

सरपंच अण्णासाहेब मोटे वाचनालयाचे सचिव जालिंदर शिंदे यांनी शहंजापुरसारख्या दुर्गम भागातील छोटया ग्रंथालयास मदत करून ग्रामीण भागातील वाचन चळवळ वाढविण्यासाठी हातभार लावल्याबद्दल मायडिया कॅरीअर कंपनीचे व्यवस्थापक तसेच स्नेहालय संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ग्रंथालयास मदतीचा हात दिल्याबद्दल ग्रंथालयाच्या वतीने कंपनी अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शहंजापुरचे मा. ग्रामपंचायत सदस्य विशाल सकट, ग्रंथालयाचे व्यवस्थापक अविनाश मोटे,आकाश मोटे हे यावेळी उपस्थित होते. ग्रंथपाल सुरेंद्र शिंदे यांनी कंपनी अधिकारी तसेच उपस्थितांचे आभार मानले.



■ मायडिया कॅरिअर कंपनीच्या वतीने शहंजापुर येथील कौंडेश्वर वाचनालयास तीन बुक केस भेट देण्यात आल्या.

---

# थिटे महाविद्यालयाच्या वतीने अस्थिरोग तपासणी

## दिडशे रुग्णांची घेतला शिबिराचा लाभ

निघोज : प्रतिनिधी

**अस्थिरोगाचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी शिरूर यांच्या वतीने मोफत अस्थिरोग तपासणी निघोज येथील मळगंगा माता मंदिरासमोर करण्यात आली. यावेळी १५० ग्रामस्थांची अस्थिरोग तपासणी करण्यात आली व मोफत औषध वाटप देखील करण्यात आली.**

मोफत अस्थिरोग तपासणीचा हा उपक्रम इतरांना प्रेरणा देणार्या पद्धतीचा असल्याचा सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रा. डॉ. द्वारकादास बाहेती यांनी यावेळी केला. या शिबिरात गावातील १५० ग्रामस्थांची अस्थिरोग तपासणी करण्यात आली. या धाकधुकीच्या जीवनात आरोग्याची विशेष काळजी घेतली पाहिजे असे निघोज गावाच्या सरपंच चित्राताई वराळ यांनी सांगितले व शिबिराचे कौतुक केले.

ग्रामस्थांनी आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये व शंका आल्यास त्वरित चाचण्या कराव्या असे सिताबाई थिटे कॉलेजचे प्राचार्य डॉ. द्वारकादास बाहेती यांनी सांगितले.यावेळी डी.फार्मचे प्राचार्य डॉ.अमोल शहा,संदीप वराळ फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ,आदी मान्यवर उपस्थितीत होते.कार्यक्रमाचे नियोजन प्रा. मोनाली परभाने यांनी केले.



---

# अबॅक्स स्पर्धेत स्वामी समर्थ क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे यश

## मनस्वी,जय,श्रीराजला बेस्ट स्टुडन्टचा बहुमान

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**थेऊर,जि. पुणे येथे झालेल्या इन्स्पायर अबॅकस अकॅडमी संचलित नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये राळेगणसिद्धी येथील श्री.स्वामी समर्थ क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.**

अनुक्रमे १ ते १० रँकनुसार स्वराज प्रशांत मापारी,श्रावणी दत्तात्रय मापारी, वेदिका साहेबराव मापारी,भक्ती विजय यादव,अदिती एकनाथ गडकर, कार्तिकी बाळासाहेब पोटे,श्रेया अनिल गाजरे, स्वराज दत्तात्रय फटांगडे,विश्वजीत योगेश मापारी, साहिल विलास पठारे, ओम दिनेश पवार,गौरव प्रशांत मापारी , जयेश एकनाथ गडकर, ग्रीष्म एकनाथ पोटे, समृद्धी सचिन मंडलिक, तेजस्विनी संभाजी रासकर यांनी उत्कृष्ठ कामगिरी केली. मनस्वी सुनील औटी, जय दयाराम पठारे, श्रीराज निलेश भूमकर यांना बेस्ट स्टुडन्ट म्हणून बक्षीसे मिळाली.या स्पर्धे ला पुणे विभागातून एकूण ८५० विद्यार्थी सहभागी झाले होते. राळेगणसिद्धी स्वामी समर्थ क्लासच्या संचालिका व मार्गदर्शक शिक्षिका सौ. माया गणेश भोसले यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले. या यशामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला व पालक आनंदी झाले.



---

# राळेगणसिद्धीच्या शिक्षकांचा संसद अभ्यास दौरा!

## विविध स्थळांचीही केली पाहणी

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**देशातील लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी आणि संसदीय कार्यप्रणाली कशी चालते हे समजून घेण्यासाठी राळेगणसिद्धी येथील एकनाथ भालेकर व शरद मापारी या दोन शिक्षकांनी भारतीय संसदेचा नवी दिल्ली येथे जाऊन अभ्यास केला. राळेगणसिद्धीचे सुपुत्र व सध्या नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयात सह संचालक पदावर कार्यरत असलेले डॉ. गणेश पोटे यांच्या विशेष सहकार्यातून व मार्गदर्शनातून या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी त्यांनी संसदेच्या कामकाजाची माहिती,संसदीय प्रक्रिया, विधेयकांचे सादरीकरण आणि चर्चा कशी होती याबाबत माहिती जाणून घेतली. तसेच भारतीय लोकशाही व्यवस्थेतील संसदचे महत्त्व व इतिहास, लोकसभा आणि राज्यसभा ही दोन्ही सभागृहे, संसदीय ग्रंथालय, सेंट्रल हॉल, जुने संसद भवन आणि संसद संग्रहालय यांना भेट देऊन ऐतिहासिक दस्तऐवजांचा अभ्यास केला. संसदेतील मार्गदर्शकांनी त्यांना कायदे कसे तयार होतात, संसदेतील प्रश्नोत्तरांचा तास आणि समित्यांचे कार्य याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व पंतप्रधान कार्यालयाचे माजी राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी त्यांना संवाद साधण्याची संधी मिळाली.यावेळी त्यांनी राष्ट्रपती भवन, राष्ट्रीय वस्तू संग्राहालय, प्रधानमंत्री संग्रहालय, लाल किल्ला, इंडिया गेट, राष्ट्रीय युद्ध स्मारक, परमवीर मेमोरियल, महाराष्ट्र सदन, राजघाट, राष्ट्रीय गांधी संग्रहालय, कुतुब मिनार, लोटस टेम्पल, अक्षरधाम मंदिर, गुरुद्वारा बंगला साहिब, हुमायूं का मकबरा, जामा मज्जिद, दिल्लीतील सरकारी शाळा आदी ठिकाणांना भेट दिली.

हा अभ्यास दौरा आमच्यासाठी प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक त्याचबरोबर संसदेच्या कार्यपद्धतीबद्दल आमचे आकलन वाढवणारा होता. दिल्लीतील ऐतिहासिक वारसा, परंपरा आणि आधुनिक भारताच्या प्रगतीचा आढावा घेता आला, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या अभ्यास दौऱ्यासाठी खासदार नीलेश लंके, राष्ट्रपती भवन कार्यालयाचे स्काडन लीडर अंकुर नाईक, संसदीय कार्य राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव धीरज सोनजे, संसद सुरक्षा सहायक कमांडट प्रशांत कारंडे, अक्षय पांगरीकर आदींचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



■ संसद भवनाच्या प्रांगणात डॉ. गणेश पोटे, सह संचालक, अर्थ मंत्रालय, भारत सरकार, शिक्षक एकनाथ भालेकर आणि शरद मापारी.

### एकात्मतेचा संदेश देणारी प्रक्रिया

संसदेतील कामकाज कसे चालते हे पाहणे आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणे हा एक प्रेरणादायी अनुभव होता. तसेच हा अभ्यास दौरा म्हणजे केवळ पर्यटन नव्हे, तर ज्ञान, अनुभव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया ठरली.

**डॉ. गणेश पोटे,**
सह संचालक, अर्थ मंत्रालय, भारत सरकार.

### राष्ट्रभक्तीची भावना

संसदेचा अभ्यास दौरा हा केवळ एक उपक्रम नसून, तो तरुणांना लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रेरित करणारा होता. अशा प्रकारच्या अभ्यास दौऱ्यांमुळे युवकांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि राष्ट्रभक्तीची भावना निर्माण होते.

**शरद मापारी,** शिक्षक

### प्रेरणदायी दौरा

संसदेला भेट देणे हा अनुभव आमच्यासाठी खूप प्रेरणादायी ठरला असून, लोकशाही प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा आहे, याची जाणीव झाली. लोकशाही समजून घेतल्याशिवाय तिचे रक्षण करणे शक्य नाही, असा संदेश या अभ्यास दौऱ्यातून आम्हांला मिळाला.

**एकनाथ भालेकर,** शिक्षक

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com